ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

# तमाशाचे बदलते स्वरुप

**प्रा. डॉ. महादेव कांबळे**
मराठी विभाग प्रमुख,
दिंडोरी महाविद्यालय.
महाराष्ट्र भारत

*'तमाशा' ही महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाशी जोडलेली व बहुजन समाजाचे मनोरंजन करणारी मराठमोळी लोककला आहे. महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी, अशा भूमीत या लोककलेचाही विकास झालेला दिसतो. महाराष्ट्रीयन समाज तमाशाने कधी बिघडला नाही व कीर्तनाने कधी सुधारला नाही, असे ही बोलले जाते. तमाशा या कलेला तिचा इतिहास व एक वेगळी परंपरा आहे. ही कला जीवंत राहावी, तिचा विकास व्हावा यासाठी हजारो कलांतांनी हाडाची काडे व रक्ताचे पाणी केलेले दिसून येते. या कलेची जोपासना करणाऱ्या कलावंतांनी वेळोवेळी झालेली उपेक्षा, अवमान व अवहेलना सहन करत या कलेवर प्रेम केले. आज या तमाशाचा मूळ ढाचाच बदलत चालला आहे, आणि तो या कला प्रकाराला मारक आहे.*

**तमाशाची जडण-घडण -**

महाराष्ट्रील लोक नाटयाचा एक प्रकार म्हणजे तमाशा. तमाशा करुन दाखविणाऱ्याला तमासगीर असे म्हणतात. मराठी विश्वकोशात तमाशा हा शब्द मूळचा मराठी भाषेतील नसून तो उर्दुतून मराठीत आला आहे व तेरा-चौदाचा शतकारत द. भारतात मुसलमानी अंमल सुरु झाल्यापासून मराठीत तो आला. असा उल्लेख आढळतो तर भारतीय संस्कृती कोशात तमाशा हा शब्द अरबी असून त्याचा अर्थ् प्रेक्षणीय दृश्य असा आहे. तमाशाचा शिल्पकार अर बी असल्यामुळे ही संस्था मुसलमानांच्या प्रभावातून उदयाला आली असावी असा काही विद्वानांचा कयास आहे. (उदा. श्री. के. काळे, श्री. नामदेव व्हटकर, श्री. विश्वनाथ शिंदे इ.) संत एकनाथांच्या एका भारुडात ध्बडे-बडे तमाशा देखेङ अशी् ओळ आहे. तमाशा म्हणजे 'उघडा देखावा' असा त्याचा अर्थ आहे. भक्ती आणि श्रृगांर या दोहोंच्या संयोगातून तमाशाचा जन्म झाला आहे. तसेच पूर्वीच्या काळी युद्वाच्या मोहिमेवर असलेल्या मराठा सैनिकांना महिनेच्या महिने बायकामुलांपासून दूर पौजी तळांवर राहावे लागे. अशा शिपाई गडयांची करमणूक करण्याच्या उद्देशाने तमाशाच्या गमतीचा हेतुत जन्म झाला असावा असे काही विद्वानांचे मत आहे. वरवर पाहता तमाशा या खेळात भडक श्रृगांर वाटत असला तरी तमाशातील सुप्रसिध्द शाहीर पठ्ठे बाजीराव तमाशाबद्दल असे म्हणतात की,
*लौकर यावे सिध्द गणेशा आतमध्ये कीर्तन वरुन तमाशा.*

तमाशा कसा निर्माण झाला हे पाहण्यासाठी मराठी राज्याच्या स्थापनेपासून खेडयापाडयात कोणत्या लोककला प्रचलित होत्या आणि कालांतराने त्यात कोण-कोणते फरक होत गेले हे पाहिले पाहिजे.

**स्वरुप -** भारताच्या विविध भागात विविध स्वरुपाचे लोकनाटय प्रकार आढळून येतात उदा. अत्तर व मध्य भारतात-रामलिला,रासलिला, स्वांग, नौटंकी, इ. गुजरात-भवाई, बंगाल-बिहारमध्ये जत्रा, गंभीरा, कीर्तनीया इ.दक्षिण भारतात-यक्षगान, विथीनाटकम कामनकोट इ. तर महाराष्ट्रात-तमाशा, खेळ, खडीगंमत इ. महाराष्ट्रात तमाशाचे खेळ ब-याचदा होळीसारख्या सणात किंवा खेडयापाडयातील जत्रा-उत्सवाच्या प्रसंगी होत या खेळाला पडदयाची अथवा नेपथ्या गरज नव्हती. एखादया पिंपळाच्या परासारख्या ऐसपैस उंच जागेवर किंवा परांगणावर हा खेळ रंगत असे. श्रृंगार प्रधान लावण्य सादर करणे व त्या अनुषंगाने श्रृंगार हास्यात्मक अशी करमणूक करणे हे तमाशाचे स्थूल स्वरुप होय.

तमाशाचा उदय नेमका कधी, कोठे व कोणत्या परिस्थितीत झाला या विषयी विचारवंतांमध्ये मतभेद असले तरी तमाशा नावारुपाला झाला तो पेशवाईतच यात कसलेच मतभेद नाहीत. पेशवे कालिन तमाशाला ढोलकीच्या तालावर तमाशा म्हणत. या काळात तमाशाचा मुख्य भार नाचगाण्यावर होता. सरदार, सोंगाडया आणि नाच्या या तिघांवरच तमाशाचे यश-अपयश अवलंबून असते गणगौळण, लावण्या, भेदिक कवणे व मुजरा ही पेशवेकालिन तमाशाची प्रमुख पाच अंगे होती.

**पेशवाई नंतरचा तमाशा -** तमाशाचा आत्मा म्हणजे घ्वगड हा वगच मुळात १८६० नंतर जन्माला आला आहे. पेवशे कालीन तमाशात लावणी आणि शाहीरांचे फंड दिसून येतात पठ्ठे बापुराव, उमाबापू, साळजकर, शिवासंभा कौलापूरकर, अर्जुनराव वाघोलीकर, भाउ व बापू नारायणगावकर इ. पेशवे कालीन लावणी प्रधान संगीत तमाशाचे रंजनप्रधान, वगप्रधान तमाशात रुपांतर केले असे म्हटले जाते, त्यानंतरच्या तमाशा कलावंतानी उदा. हरिभाउ वडगांवकर, रामा कुंभार वर्धनगडकर, बाबुराव कुरणकर, तुकाराम खेडकर अनेक तमास गिरांनी तमाशाला रंजनरुपदेवून तमाशाचे कार्यक्रम महाराष्ट्र भर सादर केले वग नाटयाचा प्रवेश तमाशात झाल्यानंतर ज्या पात्रामुळे तमाशा खऱ्या अर्थाने जिंवत वाटतो ते पात्र 'सोंगाडया' या पात्राचा विकास झाला हे मान्य करावे लागते.

**तमाशाचे बदलते स्वरुप :-** पेशवाईत नावाजलेले प्रसिध्द शाहीर प्रभाकर, परशराम, रामजोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, होनाजी बाळा इ. इ. स. १८५० पर्यंत मृत्यु पावलेले दिसून येतात. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात तमाशाला काही प्रमाणात राजाश्रय होता. तो इंग्रजी राजवटीत तुटत चाललेला दिसून येतो. याच दरम्यान श्रेष्ठ नाटककार विष्णू दास भाळयांनी नाटकाचा पाया घातला त्याचे रुपांतर नवे सांस्कृतिक करमणुकीचे युग अवतरण्यात झाले. त्यामुळे तमाशा हा केवळ ग्रामीण असंस्कृत लोकांच्या करमणुकीचे साधन झाले याचा परिणामक की, काय तमाशात अश्लीलता क्रमाणे वाढत गेली. उत्ताण हावभाव आणि उत्ताण गाणी गात नाचणाऱ्या केवळ स्त्रियांची संगीत बारी तमाशात लोकप्रीय बनली, तबला, वादक, ढोलकी पट्टू, पेटीवाला, सुरत्या आणि सोंगाडया यांचया मदतीने या या बारीतील स्त्रीया जुन्या शृंगारीक लावण्यांबरोबर अलिकडच्या मराठी बोलपटातील शृंगारीक गाणीही गाऊ लागल्या. उत्ताणतेमुळे पैसा मिळु लागला, पैशासाठीच उत्ताण हावभाव व अश्लिलतेचा जन्म तमाशात झाला असे म्हणावे लागेल. पैस घ्यायला नाचीआली की, तिच्या कोणत्याही अंगाला स्पर्श करुन तिला आपल्या आवडीची लावणी म्हणावयासा सांगणे, या प्रकाराला दौलतजादा असेही म्हणतात. याचे वाढते प्रमाण बघून स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई सरकारने इ. स. १९४८ मध्ये तमाशा सुधारणा समिती स्थापून तमाशातील अनिष्ट प्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न केला गेला.

तमाशाचे गण, गौळण, बतावणी, रंगबाजी, फार्स, वग, मुजरा (दौलतजादा, भेदिक कवने, छककड, संगीतबारी, रुजाबाज, अजलेवा) तमाशा आज दिसत नाही, पूर्वी गण-गौळणीस गोपी कृष्णाच्या लीलांवर आधारीत गौळणी प्रेक्षकांच्या परिचयाच्या असल्यातरी त्या सादर करतांना त्यात नित्य नवा रंग भरुन ती रंजन प्रधान कसा होईल याकडे लक्ष देत असत. आज मात्र तमाशामध्ये अस्सल गावरात शब्दकेक हा तमाशाची नाजकतही कमी होत आहे. एवढेच नव्हे, तर ढोलकी, तुणतुण्याऐवजी आता बेंजोचा ऑक्टोपॅडचा वापर केला जात आहे.

गण-गौळणीला फारसा वेळ दिला जात नाही. त्यामुळे त्यातली मजा नाहीशी झाली आहे. गौळणीनंतर विविध प्रकारच्या विशेषतः शृंगारिक लावण्या गाण्याचा कार्यक्रम होत असे. आजही तमाशात संगीत लावणी, रंगबाजी सादर केली जाते. मात्र लावणीच्या नावाखाली सिनेमातील लोकप्रिय गित किंवा आयटम सॉंग सादर केले जाते. त्यामुळे आजचा तमाशा अति उत्ताण अथवा अश्लिलतेकडे झुकतांना दिसतो आहे.

वग म्हणजे एक प्रकारचे नाटकच्, आधुनिक तमाशाचा उत्तरंग म्हणजे वग होय. तमाशात वगाचा प्रवेश झाल्यानंतर तमाशाचे स्वरुप थोडे बदलेले दिसते. रंजन प्रधान तमाशातून वगामुळे काही प्रमाणात समाज प्रबोधन होवू लागले आहे, त्यात प्रामुख्याने अण्णाभाऊ साठे, शाहिर साबळे यांनी फार मोठी जबाबदारी या कामी पार पाडली. खेडयातील भाऊबंदकी, दोन बायकांचा नवरा, इष्कबाजीचे दुष्परिणाम, दारुबाजी यांसारखे सामाजिक विषयावरचे वग सादर होवू लागले. नाटक, सिनेमा हा तीन तासांचा खेळ मात्र तमाशा रात्री सुरु झाल्यानंतर सकाळपर्यंत सुरु असायचा आज मात्र ग्रामीण भागात गण-गौळण व रंगाबाजी झाली की,लोक घरी जातात. अलिकडे वग फारसा पाहिला जात नाही कारण पूर्वीसारखे ताकतीचे वग लिहित जात नाहीत. शहरात तर वेळेचे बंधन असल्यामुळे तीन तासात जे शक्य आहे तेच सादर केले जाते तेथेही वग टाळला जात आहे. त्यामुळे तमाशा आज खऱ्या अर्थाने हरवला आहे की काय? असा प्रश्न पडतो?

सोंगाडया करकराट तमाशातले प्रमुख पात्र सोंगाडया जो तमाशाचा आत्मा होता मधल्या काळातील प्रमुख तमासगीर सोंगाडया चे काम करीत होते. उदा. झेंडे, काळु-बाळु, दादू इंदूरीकर, रघुनाथ खेडकर इ. अनेक आज असा प्रभावी सोंगाडया तमाशात दिसत नाही त्यामुळे तमाशा आज बराचसा निर्जीव झाल्याचा दिसतो.

तमाशा ही मराठी मन आणि संस्कृती अभिव्यक्त करणारी अत्यंत समृध्द आणि मराठमोळी लोककला आहे. महाराष्ट्रात कुठेही गेला तरी तमाशा माहित नाही असे म्हणणारा माणूस भेटत नव्हता. आज मात्र २१व्या शतकातील तरुणाला संपूर्ण तमाशा माहित आहे का ? असा प्रश्न पडतो. तमाशात रात्रीचा राजा दिवसामात्र भिकारी असतो. असे असुनही या मराठमोळयालोककलेचा सांस्कृतिक वारसा याच कला वंताने जपून ठेवला आहे. तमाशातील, ढोलकीवादक, पेटीवाला, सुरत्या, सोंगाडया, हद्दपार झालेला दिसतो. आज मोठ-मोठी राजकीय मंडळी लावणी महोत्सवाचे आयोजन करुन तामाशाच्या कलेला अधिकाअधिक शृंगारिक व व्यावसायिक करत आहेत. तमाशाचे स्वरुप बदलते आहे. तमाशा, नाटक, संगीत बारी आणि जागतिककरणात आर्केस्ट्रा असे त्याच स्वरुप दिसते. तमाशाचे होणारे ऑर्केस्ट्रीकरण हे आर्थिक बदलाचे व सामाजिक मानसिकतेचा परिवाक म्हणावा लागेल.

आजच्या तमाशातील आधुनिकवादये,लाईट डेकोरेशन झगमगते स्टेज, सिनेमातील लोकप्रिय व आयटम साँग या नृत्याचे सादरीकरण जातीवंत सोंगाडयाचा अभाव, गण गौळणी सादरकरणासाठीचा कमी झालेला वेळ, या सगळया गोष्टी तमाशाला मारक ठरत आहेत. या बदलाकडे जागतिकीकरणाचा परिणाम या दृष्टीने पाहणे योग्य होणार नाही. कारण काळाच्या प्रवाहात नाटक सिनेमा बदलला आहे. तमाशाही बदलला पाहिजे. बदल थांबविणे कोणत्याही हाती नसते, मात्र बदल समाजहित साधणार आहे की, नाही ? तो तारक आहे की मारक, तो कितपत योग्य आहे हे पाहणे महत्वाचे आहे.

१९३३ मध्ये पडद्यावर दिसणारे बोलपट आले आणि नंतर १९७४ मध्ये तमाशावर बंदी घालण्यात आल्यामुळे तमाशाचे स्वरुप पार बदलून गेले. अनेक संकटे आली तरीही तमाशाची लोकप्रियता कमी झाली नाही. पारंपारिक तमाशा तशाही परिस्थितीत टिकून राहीला. आज अशी कसलीही बंधने नसतांना पारंपारिक तमाशा लयास जातो आहे. याचे दु:ख वाटते. एक काळ असा होता, की तमाशाचे फड चालविणारे कलावंत शेकडोच्या संख्येत आपला कुटुंबा घेऊनच गावोगावी जात होते. तमाशा सादर करत होते. किंबहुना अनेकांची जवानी तमाशाच्या शाहुच्यामध्येच उभारील यायची आणि तिथेच त्यांचे संस्था हे फुलायचे भटक्याचे जगने आणि तमाशा कलावंतांचे रोजी रोटीच्या लढाईत पुढे मात्र गावोगावी भटकणे दोन्ही जणू स्समांतरच होते. पुढे मात्र असा एक मोठा काळ गेला आहे, ज्यामध्ये जबरदस्त फड गाजविलेल्या तामाश कलावंतांच्या वाटयाला आर्थिक विवंचना आणि वंचना आल्या, मोठी कर्जे काढावी लागली एवढेच नव्हे तर कर्जाच्या ओघ्याखाली थकलेल्या काही मंडळींना आपल कड विकावे लागले. इतकी वंचता वाटचाली घेऊनही त्या कलावंताच्या काळजात तमाशाचीच धडकन होती. तमाशा हाच जण त्यांचा खास होता. पैसा नसतानाही त्यांनी तमाशाला श्वास मानला. अलिकडे काही जणांना तमाशातून चांगला पैसा मिळतो आहे. मात्र तमाशात ज्ञान राहिली नाही. हे वैकल्प संपवायचे अनेक, तर ज्यांच्याकडे गुणवत्ता आहे, मुळात तमाशा या कलेकडे जगण्याची कला, जीवनाची कला या दृष्टीने पाहण्याची सकारात्मक आहे, असे कलावंत आणि असे रसिकही नवयाने निर्माण करावे लागतील. ते करायचे असेल, तर नवनव्या इन्स्ट्रूमेंट व कॉन्टेन्टची सरमिस करुन तामाशाचे झालेले हायब्रीड आधी जमवायला हवे. कारण तमाशाचा उज्वल बाज कायम राखायला हवा.

**संदर्भ :**

१) किरवले कृष्णा : आंबेडकरी शाहिरी एक शोध, जालंदा प्रकाशन पुणे, १९९२
२) ठोकळ ग. ल. (संपादक) आणि इतर : दगडू बाबा साळी वग व लावण्या मराठी तमाशा परिषद प्रकाशन पुणे् (१९६१).
३) म्हटकर नामदेवः मराठी लोकनाटय तमाशा कला आणि साहित्य, यशस्वी प्रकाशन कोल्हापूर (१९७५).
४) डॉ. इनामदार, अप्पासाहेब : मराठी तमाशा, काल, आज आणि उद्या, सुगंध दिवाळी विशेषांक १९७४.